तरूण भारत

# डॉ. आंबेडकर जयंतीदिनी विद्यापीठातर्फे ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्राच्या वतीने ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार १४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्टीय संरक्षण विषयक विचार" या विषयावर पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास अधिविभागप्रमुख डॉ. विजय खरे ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जास्तीत जास्त लोकांनी ऑनलाईन व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व संशोधन केंद्रप्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांनी केले आहे.

लोकमत

# 'डीओटी'मध्ये लक्षणे नसलेल्या ६० रुग्णांवर उपचार

## कोविड केअर सेंटरला जादा डॉक्टर्सची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'डीओटी' (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी)मध्ये महानगरपालिका प्रशासनातर्फे सोमवार (दि. १२) पासून कोविड केअर सेंटर सुरू करण्यात आले. तेथे सीपीआर व आयसोलेशन रुग्णालयातील कमी लक्षणे असलेल्या ६० रुग्णांना स्थलांतर करून उपचार सुरू केले. या सेंटरला जादा डॉक्टर्स, नर्स आणि रुग्णवाहिकेची गरज आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात कोविड रुग्णांची संख्या वाढत चालली असून रुग्णांवर उपचार कुठे आणि कसे उपचार करायचे, असा प्रश्न जिल्हा प्रशासन आणि आरोग्य प्रशासनासमोर आहे. शिवाजी विद्यापीठातील डीओटी, वसतिगृहाची इमारत, लाईन बाजारजवळील अंडी उबवण केंद्र, शेंडा पार्क प्रशिक्षण केंद्राची इमारत अशी चार कोविड केअर सेंटर्स पुन्हा सुरू करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला असून त्यातील डीओटी सेंटर सोमवारपासून प्रत्यक्षात सुरू करण्यात आले. कमी लक्षणे असलेल्या सीपीआर रुग्णालयातील ४०, तर आयसोलेशन रुग्णालयातील २० कोविड रुग्णांना तेथे सोमवारी रात्रीपर्यंत स्थलांतर करण्यात आले. सध्या नवीन कोविड रुग्णांवर त्यांच्या घरातच उपचार करण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे महापालिका उपायुक्त निखिल मोरे यांनी सांगितले.

 

कोल्हापूर : पक्षी वाचवा अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या कार्यक्रमात पक्ष्यांची घरटी व पाणीपात्रे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील व इतर. दुसऱ्या छायाचित्रात राजाराम महाविद्यालयास पक्ष्यांची घरटी व पाणीपात्रे देताना दै. 'पुढारी'चे सहायक सरव्यवस्थापक (प्रशासन) राजेंद्र मांडवकर व इतर. (छाया : पप्पू अत्तार, रवींद्र बागल.)

# पर्यावरणपूरक 'पक्षी वाचवा अभियान' अनुकरणीय

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन, जैन सोशल ग्रुपचा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वाढते शहरीकरण व जंगलतोड तापमानवाढीस कारणीभूत ठरत आहे. कडक उन्हाच्या झळा पक्षी जगतावर विपरीत परिणाम करीत आहेत. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाणी, नैसर्गिक घरट्यांची व्यवस्था करणे अत्यावश्यक बनले आहे. पशु-पक्षी असतील तरच मानव जगू शकेल. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पर्यावरणपूरक 'पक्षी वाचवा अभियान' अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन, जैन सोशल ग्रुप (मेन), कॉन्झर्व्हेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने पक्षी वाचवा अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठ व राजाराम महाविद्यालय येथे पक्ष्यांसाठी पाणीपात्रे, घरटे व धान्य सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमास दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, सहायक सरव्यवस्थापक (प्रशासन) राजेंद्र मांडवकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवछत्रपतींची पर्यावरणनीती आजही प्रेरणा देते. याच प्रेरणेतून पाणीदार विद्यापीठ साकारताना विद्यापीठ जैवविविधतेने संपन्न बनले आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांच्या अन्न, निवारा आणि पाण्याच्या व्यवस्थेसाठीचा हा उपक्रम स्तुत्य असून दरवर्षी हा उपक्रम राबवला पाहिजे. जैन सोशल ग्रुपच्या अध्यक्षा रज्जूबेन कटारिया यांनी पर्यावरणच्या जतन-संरक्षणासाठी अग्रेसर असणाऱ्या दै. 'पुढारी'ने उपक्रमास सहकार्य केल्याबद्दल आभार मानले. आशिष घेवडे यांनी पर्यावरणपूरक घरटी कशी तयार करावीत, याची माहिती दिली. जयेश ओसवाल यांनी आभार मानले. यावेळी सातारा येथील जैन सोशल फेडरेशनचे जवानमल जैन, सचिन दोशी आदी उपस्थित होते. दरम्यान, राजाराम महाविद्यालय येथे पक्ष्यांसाठीची पाणीपात्रे, निवाऱ्यासाठी घरटे व धान्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी वनस्पती शास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली पाटील, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय पाठारे, अतुल शहा, वनेचंद ओसवाल आदी उपस्थित होते.

### छायाचित्रे पाठविण्याचे आवाहन

पक्ष्यांसाठी आपण तयार केलेली घरटी, पाण्याची व्यवस्था व सीड बॉल्स याच्यासोबत सेल्फी काढून छायाचित्रे आमच्याकडे पाठवावीत. निवडक छायाचित्रे प्रयोग सोशल फाऊंडेशनच्या फेसबुक पेजवर प्रसिद्ध करण्यात येतील. छायाचित्र pudhariyouthconnect@gmail.com या ई-मेलवर पाठवावीत.

सकाळ




**कोल्हापूर : श्री रवळनाथ को ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार झाला. यावेळी एम. एल. चौगुले, प्रा. डॉ. दत्ता पाटील, मधुकर हरगुडे आदी.**

# कुलगुरू शिर्के यांचा 'रवळनाथ'तर्फे सत्कार

कोल्हापूर, ता. १३ : येथील श्री रवळनाथ को- ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार झाला.

शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन 'नॅक' परिषदेकडून 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाल्याबद्दल हा सत्कार झाला. सिनेट सदस्य व 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते सत्कार झाला.

कोरोना संकटाच्या काळातही विद्यापीठातील दर्जेदार अभ्यासक्रम, अध्यापन व अध्ययन पद्धती, संशोधन, नावीन्यपूर्ण संकल्पना, पायाभूत सुविधा, उत्तम प्रशासन या जोरावर विद्यापीठाला सर्वोच्च मानांकन मिळाले. त्यामुळे विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता राष्ट्रीय पातळीवर अधोरेखित झाली आहे, असे यावेळी श्री. चौगुले यांनी सांगितले.

प्रा. डॉ. दत्ता पाटील, 'रवळनाथ'चे कोल्हापूर शाखाध्यक्ष मधुकर हरगुडे, प्रा. डॉ. अण्णासाहेब कलगोंडा, शाखाधिकारी पंकज कुंभार आदी यावेळी उपस्थित होते.

# स्त्रियांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या बाबासाहेबांना कोल्हापुरातून बळ

## ऐतिहासिक घटनेचे लवकरच होणार दस्तऐवजीकरण

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

स्त्रियांवरील अन्यायाची समाजातील तत्कालीन व्यवस्था मोडीत काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. याची दखल घेत कोल्हापूरच्या महिला मंडळांनी १९५२ ला बाबासाहेबांचा सत्कार करून बळ देत पुरोगामी असल्याचे दाखवून दिले. या ऐतिहासिक घटनेचे लवकरच दस्तऐवजीकरण केले जाणार आहे.

हेब आंबेडकर
ी विशेष


डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,
यांना सादर मानपत्र समर्पण

स्त्रियांना सर्व हक्क मिळावेत, आत्मभान यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर संघर्ष केला. बाबासाहेबांनी तयार केलेल्या हिंदू कोड बिलामध्ये पतीच्या संपत्तीत पत्नीचा हक्क, घटस्फोट हक्क व पोटगी तरतूद, दत्तक निवडण्याचा व घेण्या-देण्याचा हक्क, द्विभार्या प्रतिबंध, वडिलांच्या मिळकतीत मुलीचा हिस्सा, आंतरजातीय विवाहास मान्यता, आदी महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश होता. पंडित जवाहरलाल नेहरू व इतर नेत्यांनी बिलाचा मसुदा लोकसभेत मांडण्याची त्यावेळी संमती दिली. त्यानंतर बिलास सभागृहात व बाहेर विरोध झाला. ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत 'हिंदू कोड बिल' मांडले गेले. सप्टेंबर १९५१ मध्ये ते मान्य न झाल्याने पान २ वर

"



बाबासाहेबांचा स्त्री हक्कासाठीचा संघर्ष होता. हिंदू कोड बिल नंतरच्या काळात तुकड्या तुकड्यांत मंजूर झाले. त्यांच्या संघर्षाच्या काळात कोल्हापूरच्या महिला भगिनींनी त्यांचा सत्कार केल्याने त्यांना पुन्हा उभारी मिळाली. आज सर्व स्त्रियांना बाबासाहेबांच्या संघर्षामुळेच हक्क प्राप्त झाले आहेत. अभ्यासकांच्या प्रयत्नातून लवकरच या ऐतिहासिक घटनेचे दस्तऐवजीकरण करण्यात येणार आहे.

**- डॉ. श्रीकृष्ण महाजन,**
संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ.

लोकमत

# जनता कर्फ्यूपेक्षा ध्वनीपातळीत वाढ

## ‘वीकेंड लॉकडाऊन’ : कोल्हापूर शहरातील विविध भागांतील चित्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाने वीकेंड लॉकडाऊनच्या काळात कोल्हापूर शहरातील ध्वनीपातळीचे मापन केले. त्यामध्ये गतवर्षीच्या जनता कर्फ्यूच्या तुलनेत यंदाची ध्वनीपातळी अधिक असल्याचे निरीक्षण समोर आले. मात्र, निर्धारित आदर्श पातळीपेक्षा ही पातळी कमी होती.

शहरातील महत्त्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी पर्यावरणाशास्त्र विभागाने पहिल्या वीकेंड लॉकडाऊन दरम्यान शनिवारी (दि. १०) ध्वनी पातळीचे मोजमाप केले. हे मोजमाप रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक, शांतता क्षेत्रातील आहेत. गेल्यावर्षी २२ मार्च रोजी देशभर जनता कर्फ्यूवेळी घेण्यात आलेल्या ध्वनी पातळीशी तुलना केल्यास या वीकेंड लॉकडाऊनमध्ये ध्वनीपातळी वाढल्याचे जाणवले. वीकेंड लॉकडाऊनमध्ये सरकारने काही क्षेत्राला दिलेल्या परवानगीने ध्वनीची पातळी जनता कर्फ्यूमधील ध्वनी पातळीपेक्षा अधिक असल्याचे जाणवले आहे, अशी माहिती पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी दिली.

दरम्यान, डॉ. जाधव, सहयोगी प्राध्यापक डॉ. पी. डी. राऊत, पी. आर. भोसले, एन. बी. पोखर्णीकर, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, एम. एस्सी.चे विद्यार्थी योगेश गलगले, राहुल पाटील, अक्षय पाटील, महेश चव्हाण यांनी ध्वनी पातळीचे मोजमाप केले.



कोल्हापूर शहरात वीकेंड लॉकडाऊनमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी ध्वनी पातळीचे मोजमाप केले.

### क्षेत्रनिहाय ध्वनीपातळी (डेसिबलमध्ये)

| क्षेत्र | जनता कर्फ्यू | वीकेंड लॉकडाऊन |
|---|---|---|
| सीपीआर | ४८.४२ | ५३.२३ |
| न्यायालय | ३९.४७ | ४८.८२ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ३६.६१ | ४७.७३ |
| शिवाजी विद्यापीठ | ३६.१४ | ९.६७ |
| **रहिवासी** | | |
| राजारामपुरी | ४६.६१ | ५०.०५ |
| शिवाजी पेठ | ४३.८१ | ५२.३६ |
| उत्तरेश्वर पेठ | ४३.५४ | ५३.३८ |
| मंगळवार पेठ | ५०.५० | ५२.५३ |
| ताराबाई पार्क | ३९.११ | ४८.९५ |
| नागाळा पार्क | ३९.४७ | ४६.०५ |
| **व्यावसायिक** | | |
| राजारामपुरी | ४७.०४ | ५६.३३ |
| शाहुपुरी | ४२.६३ | ५३.८१ |
| लक्ष्मीपुरी | ४५.५१ | ५३.६३ |
| मिरजकर तिकटी | ४५.२५ | ५९.५८ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ४४.८० | ५८.३० |
| महाद्वार रोड | ४४.५१ | ५२.६३ |
| गुजरी कॉर्नर | ४१.१८ | ५४.५१ |
| पापाची तिकटी | ४२.४० | ५५.१८ |
| गंगावेश | ४३.३६ | ५६.११ |
| बिंदू चौक | ४२.०३ | ५५.४१ |
| **औद्योगिक** | | |
| वाय. पी. पोवारनगर | ३५.१० | ५१.४७ |
| शिवाजी उद्यमनगर | ३५.६१ | ५६.७१ |

### ध्वनी पातळीची मर्यादा

| क्षेत्र | मर्यादा (दिवसा) |
|---|---|
| औद्योगिक | ७५ |
| व्यावसायिक | ६५ |
| रहिवासी | ५५ |
| शांतता | ५० |

# स्त्रियांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या बाबासाहेबांना कोल्हापुरातून बळ

(पान १ वरून)

बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

स्त्रियांच्या हक्कासाठी बाबासाहेब संघर्ष करीत आहेत, त्यासाठी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला म्हणून विमलताई बागल यांच्या पुढाकाराने कोल्हापुरातील नऊ महिला मंडळांनी त्यांचा सत्कार केला. यात करवीर भगिनी मंडळ, वनिता समाज, स्त्री मंडळ, शुक्रवार पेठ भगिनी मंडळ, नामदेव महिला मंडळ, शिवाजी पेठ भगिनी मंडळ, महिला सेवा मंडळ, शारदादेवी भगिनी मंडळ, मराठा महिला मंडळ यांचा समावेश होता. २५ डिसेंबर १९५२ रोजी राजाराम टॉकीज येथे सत्काराचा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी दिलेल्या मानपत्रात बाबासाहेबांचा उल्लेख 'आधुनिक कर्ण भीमरावजी, दलितांचे देव भीमरावजी, आधुनिक भारताचे घटनाकार भीमरावजी, हिंदू कोड बिलाचे निर्माते 'आधुनिक मनू' भीमरावजी आणि माननीय बाबासाहेब' असा आदरपूर्वक केला होता. बाबासाहेबांचा स्त्रियांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहिला त्यात ते यशस्वी झाले. परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही शेवटची कोल्हापूर भेट ठरली, असे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सांगितले.